मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ११ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पोलीसांची अवैध गुटख्यावर कारवाई; लाखोंचा मुद्देमाल जप्त

## चालक फरार; तपासावर प्रश्नचिन्ह

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील गुन्हेगारी जगतात गुटखा व सुगंधित तंबाखूची अवैध तस्करी ही मोठी समस्या बनली आहे. महाराष्ट्र शासनाने आरोग्यविषयक गंभीर दुष्परिणाम लक्षात घेऊन गुटखा विक्रीस बंदी घातली असली तरी, काही माफिया गट अजूनही कायद्याला डावलून हा घातक पदार्थ बाजारात आणण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करत आहेत.

जालना तालुका पोलीस ठाण्याला दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजी मिळालेल्या गुप्त माहितीद्वारे पुन्हा एकदा या अवैध रॅकेटचे धागेदोरे उलगडले. सतिश उर्फ लाला जैस्वाल हा आपल्या हस्तकांमार्फत मोठ्या प्रमाणावर गुटखा वाहतूक करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळताच, पोलिसांनी काटेकोर सापळा रचला.

मौजे बोरखेडी येथे संशयित महिंद्रा पिकअप (MH 21 X 1058) थांबविण्यात आली. मात्र चालकाने पोलिसांना चकमा देत पळ काढला. वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता तब्बल रु. ९,५६,२५० किंमतीचा गुटखा आढळून आला. त्याचबरोबर पिकअप वाहनाची अंदाजे रु ५,००,००० किंमत असा पोलिसांनी एकूण रु १४,५६,२५० किमतीचा अवैध माल जप्त केला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी व पोलीस निरीक्षक एस.आर. साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रत्यक्ष अंमलबजावणीस सहाय्यक पोलीस निरीक्षक जी.एल. अंतरप, पो. उपनि. एस.एस. नागरगोजे, तसेच अंमलदार बळीराम तळपे व अभिषेक शिरगुळे यांनी महत्वाची भूमिका बजावली.

या कारवाईतून एक गोष्ट अधोरेखित होते की, गुटखा माफिया अजूनही जिल्ह्यात सक्रीय असून, पोलीस यंत्रणा सतत त्यांचे बालेकिल्ले मोडण्याचा प्रयत्न करत आहे. गुटख्याची तस्करी ही फक्त कायदेशीर गुन्हा नसून, समाजाच्या आरोग्याशी थेट खेळणारा प्रकार आहे. तंबाखूमुळे निर्माण होणारे मुखाचा कर्करोग, दात-तोंडाचे आजार, तसेच युवकांमध्ये वाढणारे व्यसनाधीनतेचे प्रमाण यामुळे सरकारने गुटखा बंदी घातली. मात्र, नफ्याच्या हव्यासापोटी काही व्यापारी व दलाल अजूनही हा व्यवसाय जिवंत ठेवत आहेत.

अशा प्रकारच्या तस्करीत स्थानिक स्तरावर राजकीय, आर्थिक व सामाजिक पाठबळ असते. अन्यथा पोलिसांच्या कारवाईनंतरही गुटख्याचे साठे जिल्ह्यात कसे येतात हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

**चालक फरारावर प्रश्नचिन्ह**

या कारवाईदरम्यान, वाहनचालकाने पोलिसांना चकमा देत फरार होण्यात यश मिळवले. हा मुद्दा अनेक प्रश्न निर्माण करतो, पोलिसांचा सापळा एवढा काटेकोर असूनही चालक कसा पळून जाऊ शकला?, गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून कारवाई करण्यात आली होती, मग संशयिताला आधीच खबर लागली होती का?, स्थानिक स्तरावर कोणत्यातरी माहिती गळतीचे संकेत आहेत का?, या सर्व शंकांमुळे तपासाची दिशा अधिक गुंतागुंतीची झाली आहे.

### कारवाईचे भिजत घोंगडे

मुळात कारवाई बोरखेडी परिसरात झाल्याचे पोलीसांनी प्रसिद्धीस दिलेल्या प्रेसनोट मध्ये म्हटले आहे. मात्र, त्यातच देऊळगाव राजा - जालना रोडवर कारवाईचा उल्लेख असल्यामुळे नेमकी कारवाई कोठे झाली याबद्दल अनेक प्रश्न निर्माण होत आहे. खबरी जीवावर बेतून माहिती पोलीसांपर्यंत पोहचवतो हे खरे मात्र, त्यानंतर पोलीसांची भुमिका ही महत्त्वाची असते. मौजे बोरखेडी हे सिंदखेड राजा मार्गावर आहे. मुळात युवा आदर्शला मिळालेल्या माहितीनुसार एक आयशर आणि एक महिंद्रा पीकअप अशी दोन वाहने हे बोरखेडी परिसरात पोलीसांनी पकडली होती. मात्र, आयशर मध्ये गुटख्याच्यांच्या पोत्यांची संख्या कमी होती. त्यामुळे ते वाहन सोडून देण्यात आले. तर पीकअप वाहनावर कारवाई झाली. ही कारवाई दुपारच्या दरम्यान झाली. आणि पीकअप वाहन (चालक फरार) साडेपाच वाजेनंतर तालुका पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तो आयशर बोरखेडी कडुन जालनाकडे येत सिंदखेड राजा चौफुलीकडून देऊळगाव राजा मार्गाकडे जाताना त्या मार्गावर काही काळ थांबला होता. आणि त्यामुळेच प्रेस नोटमध्ये पोलीसांकडून देऊळगाव राजा रोड- जालनाचा उल्लेख झाला असा असावा? मुळात येथे मुद्दा उपस्थित होते की, पोलीसांचे संभाषण कुणाशी सुरु होते? बोरखेडी ते जालना तालुका पोलीस ठाण्याचे अंतर किती? कारवाईनंतर वाहन येथे पोहचण्यास लागणारा वेळ किती?




### वाहनाचा पाठलाग केला म्हणे, मग चालकांचा पाठलाग का नाही ?

पोलीसांनी वाहनचा पाठलाग करुन कारवाई केल्याचे सांगितले तर वाहन चालक फरार झाला तो पायी पळत गेला की नासातून एखादे रॅकेट आले होते चालकाला फरार करायला? का मिस्टर इंडिया चित्रपटातील ती घड्याळ या चालकाकडे तर आली नाही ना? त्यावेळी त्याचा पाठलाग पोलीसांना का? करता आला नाही. असा प्रश्न निर्माण होत असून पोलीसांच्या कार्यक्षमतेवर आणि तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.

---

युवा आदर्श

## हरितालिका कथा

हिम दुहिता पार्वती
हरितालिका पुजिते
शिवशंभो हवा पति
मनोमन वर योजिते
कठिण व्रत वैकल्ये
ती सहजगति करते
अधिकार स्वयंसिध्द
कैलासाधिपति वरते
आकर्षी ती दृढ व्रते
भोल्या शंकरा द्रवते
आदिशक्ती गिरीजा
महादेव मना भावते
महिला संकल्प शक्ती
पुराण काळी दिसते
निरामय गाढ भक्ती
नारी हृदयात वसते
नव युगा का नसावी
नारीला गं तिची मते
पुरूष प्रधान संस्कृती
का घेते सदा तू नमते
कुमारिका सुहासिनी
एकत्रित व्रत निमीत्ते
स्नेह मेळा जमलेला
पुजा पाठ शांत चित्ते
जपे परंपरा अर्थ पूर्ण
गं दौडताना प्रगतिरथे
नव युगाच्या ललनेनी
जाणून घ्यावी मनोरथे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते पावसामुळे नुकसान झालेल्यांना मदतीच्या संचाचे वितरण



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या सततधार पावसामुळे बाधित झालेल्या शहरातील कुटुंबांना सेंटर फॉर एग्रीकल्चर अँड डेव्हलपमेंट अर्थात कार्ड संस्थेच्या माध्यमातून शेल्टर कम हायजीन किट्सचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

जालना येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात दि.२५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता संच वाटप कार्यक्रम पार पडला. यावेळी महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त राजू एडके , सनदी लेखापरीक्षक स्नेहल मोदाळे, निखिल बाहेती, डॉ.दीपक बुक्तरे, पत्रकार नूर अहमद कुरेशी, कार्डचे अध्यक्ष सुवर्णा दांडगे, उपाध्यक्ष डॉ. रामदास निहाळ, सचिव पुष्कराज तायडे, कोषाध्यक्ष सोनिया तेलगड यांची उपस्थिती होती.

वाटप करण्यात आलेल्या शेल्टर कम हायजीन किट्समध्ये ताडपत्री, सतरंजी, मच्छरदाणी, टूथपेस्ट, ब्रश, अंगाची व कपडे धुण्याची साबण, सॅनिटरी नॅपकिन, दोरी, बॅग आदी साहित्य आहे. वाटप प्रसंगी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी कार्डच्या मदतीबद्दल अभिनंदन करून आपत्ती काळात अशीच मदत करत रहा असे सांगून संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे पान ३ वर

# महावितरणचा जास्तीच्या वीजबिलांचा शॉक; शिवसैनिकांचा महावितरणावर हल्लाबोल

## वीज ग्राहकांना दिलेली जास्तीची बिले तातडीने रद्द करा - भास्करराव अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** महावितरणच्या वतीने ग्राहकावर लादलेला अन्यायकारक अधिकार व वाढीव देयके तातडीने मागे घ्यावेत अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या नेतृत्वात व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जालना शहरातील मस्तगड येथील महावितरणच्या कार्यालयात जाऊन महावितरणचे कार्यकारी अभियंता व्यंकटेश पेन्शनवार यांना घेराव घालून प्रचंड घोषणाबाजी करत महावितरणच्या धोरणाचा तीव्र निषेध करून सदरील अधिभार तातडीने मागे घेण्याची जोरदार मागणी केली.

यावेळी उपजिल्हाप्रमुख देवनाथ जाधव, महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष मंगल मेटकर,वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश राऊत, जि.प.माजी सदस्य बबनराव खरात, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले, विधानसभा संघटक दीपक रनणवरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाप्रमुख अंबेकर म्हणाले की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म. यांचेकडून आकारण्यात येणार्या वीज देयकांमध्ये सामान्य घरगुती ग्राहकांवर असह्य आर्थिक भार टाकण्यात येत असल्याची बाब सर्वत्र निदर्शनास येत आहे. मासिक ९६ युनिट इतका अल्प वापर असूनही देयकाची रक्कम सुमारे रुपये ८५४ इतकी होत आहे. कर व अधिभार यांच्या आकारणीमुळे सामान्य ग्राहकांवर अतिरिक्त भार येत आहे. औद्योगिक व व्यापारी ग्राहकांवर लावावयाचे अधिभार प्रत्यक्षात घरगुती ग्राहकांवर लादले जात आहे. विशेषत्वाने निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे



त्यामध्ये निव्वळ उर्जा शुल्क अंदाजे रुपये ४०० असून उर्वरित रक्कम विविध अधिभार व स्थिर शुल्काच्या स्वरूपात आकारली जाते. उर्जा शुल्क, वहन शुल्क, प्रसारण शुल्क, व्हिलींग शुल्क, इंधन समायोजन अधिभार, स्थिर शुल्क तसेच विविध कर व ... की, स्मार्ट मीटर बसविण्याची योजना प्रत्यक्षात खाजगी कंपनीच्या फायद्यासाठी राबविण्यात आलेली असून, त्यातून सामान्य नागरिकांना बिल वाढणे, चुकीचे रीडिंग, आणि ग्राहक सेवेत होणाऱ्या त्रुटी पान ३ वर

# देवदर्शनाला जाण्यासाठी आता लालपरी आपल्यादारी

## अंबड व घनसावंगी तालुक्यातील जनतेने एसटीच्या टूर पॅकेजचा लाभ घ्यावा - आगारप्रमुख संदीप साठे यांचे आवाहन

**अंबड । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रा.प. अंबड आगार, जालना विभागाच्यावतीने प्रवाशांना देवदर्शन करण्यासाठी लालपरी उपलब्ध करून देण्यात येते आहे.यासाठी संबंधित इच्छुक प्रवाशांनी अंबड आगाराशी संपर्क साधून आपले रिझर्वेशन करावे त्यानंतर लालपरी थेट त्यांच्या गावी उपलब्ध होईल तरी या टूर पॅकेजचा अंबड व घनसावंगी तालुक्यातील जनतेने मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन अंबड आगार प्रमुख संदीप साठे यांनी केले आहे.

या टूर पॅकेज संदर्भात माहिती देतांना आगार प्रमुख संदीप साठे यांनी म्हटले की,एसटी महामंडळाच्या अंबड आगाराच्यावतीने सद्या ३ मार्गांवर ही सेवा सुरु असून यामध्ये अंबड-पंढरपूर-तुळजापूर-अक्कलकोट दर्शन यासाठी

जाण्याची वेळ-सकाळी ५.३० वा. (प्रत्येक एकादशीला किंवा ग्रुप उपलब्ध झाल्यानंतर) यासाठी फुल प्रवास भाडे १२१७ रुपये तसेच महिला व जेष्ठ नागरिक ५० टक्के सवलत भाडे ६०९ रुपये असे असून १ मुक्काम राहिल. त्याच प्रमाणे अंबड-तुळजापूर-सोलापुर-अक्कलकोट दर्शन,जाण्याची वेळ सकाळी ५.३० वा. (प्रत्येक एकादशीला / ग्रुप उपलब्ध झाल्यानंतर) यासाठी

फुल प्रवास भाडे ५४४ रुपये तसेच महिला व जेष्ठ नागरिक ५० टक्के सवलत भाडे २७२ रुपये असून यासाठी १ मुक्काम राहिल.त्याचप्रमाणे

अंबड-जालना-कचनेर-कुंथलगिरी-अंबड (जैन तिर्थक्षेत्र) दर्शन यासाठी जाण्याची वेळ सकाळी ५ वा. (प्रत्येक



रविवारी / ग्रुप उपलब्ध झाल्यानंतर) यासाठीफुल प्रवास भाडे ६८४ रुपये

तर महिला व जेष्ठ नागरिक ५० टक्के सवलत

भाडे ३४२ रुपये व १ मुक्काम राहिल.या मार्गशिवाय ज्यांना कोणाला इतर धार्मिक किंवा ऐतिहासिक ठिकाणी जायचं असेल तर अंबड आगाराशी संपर्क साधन्याचे आवाहनही श्री.साठे

यांनी केले आहे.

या टूर पॅकेजच्या वरील दरामध्ये फक्त प्रवास खर्च समाविष्ट आहे.महिला ग्रुप, बचत गट, ग्रुप बुकींग थेट आपल्या गावापासून जावून आपल्या गावापर्यंत सोडले जाईल परंतू अंबड बस स्टैंड ते आपले गाव याची नियतानुसार आकारणी रक्कम वेगळी होईल. या टूरसाठी महामंडळाच्या सर्व देय सवलती लागू राहतील. राहण्याचा, जेवणाचा व पार्किंगचा खर्च प्रवाशांनी स्वतः करावयाचा आहे.

सदर ग्रुप बुकिंग करीता किमान ४२ प्रवासी असणे अनिवार्य आहे अशी माहितीही आगार प्रमुख श्री. साठे यांनी दिली आहे.

अंबड व घनसावंगी तालुक्यातील इच्छुक प्रवाशांनी देवदर्शनाला जाण्यासाठी अंबड आगाराच्या ०२४८३-२७५०६५ या दूरध्वनी तसेच १८००२२१२५० या टोल फ्री क्रमांकावर शिवाय आगार व्यवस्थापक संदीप साठे (मो.९६६५५६१८९०),स. वाहतुक अधिक्षक चंद्रजीत गिलचे (मो.८४२१७४९२५३),स.कार्य अधिक्षक प्रविण इलग (मो. ९६२३१६१४३६),स. वाहतुक निरिक्षक भि.म.राठोड (मो.८८३०६३२२२८) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन अंबड आगाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# संपादकीय



## भारत रशिया मैत्रीचा नवा अध्याय

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क ( टेरीफ ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली आहे. सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क ( टेरीफ ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी फोनवरून संवाद साधत चर्चा केली. आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची असल्याने या भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून आहे. एस जयशंकर यांनी या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली या भेटीत अनेक विषयावर चर्चा झाली मात्र भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पर्दापाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली. विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे. रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली. आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. हे दोन देश पुन्हा एकत्र आले त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे हे मात्र नक्की.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# अष्टविनायक दर्शन

मोरगावचा श्री मयुरेश्वर, सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक, पालीचा श्री बल्लाळेश्वर, महाडचा श्री वरदविनायक, थेऊरचा श्री चिंतामणी, लेण्याद्रीचा श्री गिरीजात्मज, ओझरचा श्री विघ्नेश्वर, आणि रांजणगावचा श्री महागणपती असे अष्टविनायक महाराष्ट्रात आहेत.

अशी परंपरा आहे की अष्टविनायकयात्रा ही मोरगाव येथील मोरेश्वर मंदिरापासून सुरु केली जाते. सगळ्या मंदिरांचे दर्शन झाल्यानंतर पुन्हा मोरगाव येथे दर्शन करून ही यात्रा संपन्न होते. साधारणपणे अष्टविनायक यात्रेचा असा क्रम असतो.

### अष्टविनायक मंदिरांबद्दल माहिती आपण जाणून घेऊ या.

**मोरगावचा मयुरेश्वर-**

अष्टविनायकांमध्ये सगळ्यात पहिले मंदिर आहे मोरेश्वर.मयुरेश्वर. अष्टविनायक यात्रेची सुरुवात येथूनच होते. मोरेश्वरदेवस्थान पुण्यापासून ५५ किलोमीटर लांब आहे. मंदिरात जाणारा रस्ता उत्तम आहे.

मंदिर ५० फुट उंचीचे असून अत्यंत सुंदर आहे. मंदिराच्या चारही दिशांना जाण्यासाठी द्वार आहेत पण मुख्य द्वार उत्तरमुखी आहे.

मंदिराच्या आवारात दोन उंच दीपस्तंभ आहेत. मंदिराच्या बरोबर समोर एक मोठी मूषक प्रतिमा आहे. तसेच मंदिराच्या बाहेर गणेश प्रतिमेच्या सम्मुख एक काळ्या पाषाणातील मोठा नंदी आहे.विशेष गोष्ट म्हणजे नंदीची,तो सामान्यतः शंकराच्या देवळासमोर असतो. गणपतीची सुखकर्ता दुखहर्ता ही आरती समर्थ रामदास स्वामींना याच मंदिरात स्फुरली असे म्हटले जाते.

मंदिरात दिवसातून तीन वेळा सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता, आणि संध्याकाळी ८ वाजता पूजा-अर्चा केली जाते. विशेष पर्वकाळात गणेश जयंती (माघ शुक्ल चतुर्थी), गणेश चतुर्थी (भाद्रपद शुक्ल चतुर्थी),

सोमवती अमावस्या आणि विजयादशमी सणांना येथे उत्सव साजरा केला जातो.

**सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक-**

सिद्धिविनायक किंवा सिद्धटेक गाव अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात आहे. हे मंदिर अष्टविनायक यात्रेतील दुसरे मंदिर आहे. याला सिद्धिविनायक या नावाने संबोधिले जाते कारण येथे भगवान विष्णू यांना सिद्धी प्राप्त झाली होती. अशी ही मान्यता आहे की भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारा म्हणून या गणपतीला सिद्धिविनायक म्हंटले जाते.

सिद्धिविनायक मंदिर पुण्यापासून २०० किलोमीटर अंतरावर भीमा नदी च्या काठी आहे. हे मंदिर एका छोट्या टेकडीवर आहे जिला सिद्धटेक म्हंटले जाते. भाविक गणपतीला प्रसन्न करण्यासाठी या टेकडीला सात प्रदक्षिणा करतात.

मंदिरातील मूर्ती तीन फुट उंचीची असून उजव्या सोंडेची मूर्ती असलेले अष्टविनायकांतील हे एकमात्र मंदिर आहे. हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे.

१८व्या शतकात देवी अहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार करून सध्याचे मंदिर उभारले. मंदिर परिसरात असलेल्या इतर वास्तू विविध लोकांनी नंतरच्या काळात उभारल्या. हे उत्तराभिमुखी मंदिर काळ्या पाषाणातील आहे. मंदिराचे गर्भगृह १० फुट रुंद आणि १५ फुट उंच आहे.

मंदिरात साजरे होणारे मुख्य उत्सव आहेत- भाद्रपदातील गणेश चतुर्थी आणि माघ महिन्यातील गणेश जयंती.

**पालीचा श्री बल्लाळेश्वर-**

बल्लाळेश्वर देवस्थान महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात सुधागड तालुक्यात आहे. रोहा या ठिकाणाहून २८ किलोमीटर अंतरावर आहे. हे मंदिर अंबा नदी आणि प्रसिद्ध सरसगड किल्ल्याच्या मध्ये स्थित आहे. पुण्यापासून बल्लाळेश्वर मंदिराचे अंतर २०० किलोमीटर आहे.

मूळ लाकडी मंदिराचा जीर्णोद्धार करून १७८० साली सध्याचे दगडी मंदिर बांधण्यात आले. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे आणि त्याची बांधणी अश्या प्रकारे केली आहे की सूर्योदयाच्या वेळी गणपतीच्या मूर्तीवर सूर्यकिरणे पडतात. मंदिराच्या आवारात एक विशाल घंटा आहे. ही घंटा पहिले बाजीराव यांचे धाकटे बंधू चिमाजी अप्पा यांनी पोर्तुगीजांवर विजय मिळवल्यानंतर अर्पण केली होती.

मंदिरात साजरे होणारे दोन मुख्य उत्सव आहेत भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थी आणि माघ महिन्यातील गणेश जयंती. या दरम्यान धार्मिक उत्सवांची रेलचेल असते.

**महडचा श्री वरदविनायक-**

वरदविनायक मंदिरातील मूर्ती देखील स्वयंभू अर्थात आपोआप निर्माण झालेली आहे. ही मूर्ती १६९० साली मंदिराजवळील तळ्यात सापडली होती. स्थापन केलेल्या जागेवर सुभेदार रामजी महावेव बिवलकर यांनी १७२५ साली मंदिराची उभारणी केली.

मंदिरातील मूर्ती पूर्वाभिमुख आहे. या मंदिराच्या चारही दिशांना चार हत्तींची स्थापना केली आहे. या मंदिरात १८९२ पासून अखंडदीप प्रज्वलित आहे.


जगभरातून भाविक वरदविनायकाच्या दर्शनाला येतात. या मंदिरात भाविकांना गर्भगृहात जावून पूजा-अर्चा करण्याची परवानगी आहे.

वरदविनायक महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात खालापूर तालुक्यातील महाड येथे आहे.

**थेऊरचा श्री चिंतामणी-**

पुण्यापासून २५ किलोमीटर अंतरावर थेउर येथे श्री चिंतामणी देवस्थान अष्टविनायकांतील सर्वात मोठे आणि प्रसिद्ध देवस्थान आहे. हे मंदिर फार पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. सध्या असलेले मंदिर हे मोरया गोसावी यांनी बांधले.

थोरले माधवराव पेशवे चिंतामणी गणेशाचे अनन्य भक्त होते. ते या मंदिरात नेहमी दर्शनाला येत असत. आपल्या अंतकाळी त्यांनी या मंदिरातच वास्तव्य केले होते आणि येथेच त्यांचे निधन झाले.




हे मंदिर अतिशय विशाल असून दगडी बांधणीचे आहे. मंदिराच्या आवारात थोरले माधवराव यांनी लाकडी सभामंडप बांधले. मूर्तीच्या नेत्रांमध्ये हिरे आहेत.

चिंतामणी देवस्थानात तीन उत्सव मुख्य आहेत. त्यापैकी पहिले म्हणजे भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थी. या काळात येथे जत्रा भरते.

माघ महिन्यात भगवान गणेशाचा जन्मदिनी गणेश जयंती साजरी केली जाते.

कार्तिक महिन्याच्या अष्टमी ला थोरले माधवराव आणि सती रमाबाई यांच्या स्मरणार्थ रमा-माधव पुण्योत्सव साजरा केला जातो.

**लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज-**

गिरिजात्मज मंदिर लेण्याद्री या नावाने देखील ओळखले जाते. हे मंदिर पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात गणेश लेण्यांमध्ये स्थित आहे. पुण्यापासून या मंदिराचे अंतर ९५ किलोमीटर आहे.

या लेण्यांमध्ये एकूण ३० गुंफा आहेत. गिरिजात्मजमंदिर हे ७व्या गुंफेत स्थित आहे. या गुंफा सपाटीपासून १०० फुट उंचीवर आहेत. हे मंदिर अंदाजे १७०० वर्षे जुने आहे. भाविकांना गणपतीच्या दर्शनासाठी ३०० पायऱ्या चढाव्या लागतात. हे मंदिर शिल्प आणि स्थापत्याच्या दृष्टीने विलक्षण आहे. हे अतिशय साधे आणि प्राकृतिक असे आहे.

भाद्रपद आणि माघ महिन्यात मंदिरात उत्सव साजरा केला जातो. त्याशिवाय दर महिन्याच्या चतुर्थीला मंदिर शृंगारिले जाते आणि विशेष पूजा-अर्चा केली जाते.

**ओझरचा श्री विघ्नेश्वर-**

ओझर येथील विघ्नेश्वर देवस्थान पुण्यापासून ८५ किलोमीटर अंतरावर आहे. पुणे-नाशिक रस्त्यावर पुणे जिल्ह्यातील जुनार तालुक्यात कुकडी नदीच्या काठी हे मंदिर आहे.

पहिले बाजीराव पेशवे यांचे बंधू चिमाजी अप्पांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि मंदिराच्या कळसाला सोन्याने मढविले.

मंदिराच्या पूर्ण परिसराच्या चहुबाजूला भिंत आहे आणि एक विशाल प्रवेशद्वार आहे. मंदिराच्या आवारात दोन उंच दीपस्तंभ आहेत.

गणेशाची मुख्य मूर्ती पूर्वाभिमुख आहे. श्रींच्या मस्तकावर आणि बेंबीत हिरा आणि डोळ्यांमध्ये माणके जडविली आहेत.

विघ्नेश्वर देवस्थानात भाद्रपद आणि माघ महिन्यात उत्सव साजरा केला जातो. प्रत्येक महिन्याच्या चतुर्थीला उत्सव आणि विशेष पूजा-अर्चा केली जाते. कार्तिक पौर्णिमेला दोन्ही दीपस्तंभ शेकडो दिव्यांनी उजळले जातात.

**रांजणगावचा श्री महागणपती-**

पुणे-नगर महामार्गावर पुण्यापासून ५० किलोमीटर अंतरावर रांजणगाव येथे श्री महागणपती देवस्थान आहे.

सध्या असलेले मन्दिर पेशव्यांनी बांधले. या पूर्वाभिमुख मंदिराला सुंदर आणि भव्य प्रवेशद्वार आहे. मंदिराची बांधणी अशा प्रकारे केली आहे कि दक्षिणायनाच्या काळात सूर्योदयाच्या वेळी श्रींच्या मूर्तीवर सूर्यकिरणे पडतात.

श्रीमहागणपती मंदिरात चार मुख्य उत्सव होतात. भाद्रपद चतुर्थी, माघ चतुर्थी, श्रावण महिना आणि फाल्गुन महिना. या शिवाय प्रत्येक महिन्याच्या चतुर्थीला विशेष पूजा-अर्चा केली जाते.

हे आठ गणपती महाराष्ट्रात आणि जगभरात अष्टविनायक या नावाने ओळखले जातात. अष्टविनायक यात्रा करण्यासाठी पुणे हे उत्तम ठिकाण आहे. पुण्याहून बऱ्याच खाजगी कंपन्या दोन किंवा तीन दिवसात या सर्व मंदिराची यात्रा घडवतात. तसेच नाशिक वरून दर संकष्टी चतुर्थीला यात्रेचे आयोजन केले असते. आता तर महाराष्ट्रातून बऱ्याच ठिकाणी अष्टविनायक यात्रेचे आयोजन केलेले असते. तरीपण गणेशोत्सवाच्या काळात अष्टविनायक दर्शन घेण्यासाठी भाविकांची खूप गर्दी असते. अजूनही राजुरचा गणपती-जालना, कळंबचा गणपती-यवतमाळ, पद्मालय गणपती-जळगाव, टिटवाळा गणपती-ठाणे, टेकडी गणपती-नागपूर,जिल्ह्यातील प्रसिद्ध ठिकाण आहेत.

**दिलीप देशपांडे,**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**मोबाईल-८९९९५६६९१७**

### रोटरी दत्तक ग्राम नजीक पांगरी येथील शाळेत संगणक प्रयोगशाळेचे लोकार्पण

# डिजिटल युगात प्रत्येक विद्यार्थी संगणक साक्षर होणे काळाची गरज- सुनील रायठठ्ठा

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालनाने सामाजिक उपक्रमांतर्गत नजीक पांगरी (ता. बदनापूर) हे गाव दत्तक घेतले असून, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकल्प राबविण्याचा संकल्प केला आहे. हॅपी स्कूल उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवी संगणक प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. विनोदराय इंजिनिअरिंगचे व्यवस्थापकीय संचालक तथा ज्येष्ठ रोटरियन सुनील रायठठ्ठा यांच्या पुढाकारातून पाच संगणक उपलब्ध करून देण्यात आले असून, सोमवार दि. १८ ऑगस्ट रोजी या प्रयोगशाळेचे लोकार्पण समारंभपूर्वक करण्यात आले. तसेच यावेळी रोटरी कम्युनिटी समूहाची स्थापना करण्यात आली.

संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन सुनील रायठठ्ठा यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी रोटरी क्लबच्या अध्यक्षा सौ. वर्षा पित्ती होत्या. व्यासपीठावर क्लबचे सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, ज्येष्ठ रोटरियन अरुण अग्रवाल, प्रकल्प प्रमुख रमेश मगरे, सरपंच-उपसरपंच व मुख्याध्यापक डॉ. शिवाजी उगले उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात सुनीलभाई रायठठ्ठा म्हणाले की, आजचा काळ हा डिजिटल युगाचा काळ आहे. प्रत्येक व्यवहार, प्रत्येक व्यवसाय, प्रत्येक शिक्षणाची पायरी संगणकाशिवाय अपूर्ण आहे. मुलं संगणक साक्षर झाली नाहीत, तर ती भविष्यातील संधींपासून वंचित राहतील. ग्रामीण भागातील शाळांनाही आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे ही काळाची गरज आहे. या प्रयोगशाळेमुळे मुलांना प्रत्यक्ष संगणक हाताळण्याची संधी मिळेल आणि त्यांचा आत्मविश्वास वाढेल. भविष्यातील नोकरीच्या आणि शिक्षणाच्या संधींमध्ये संगणक शिक्षण ही मुलांची खरी ताकद ठरेल. माझी इच्छा आहे की या गावातील प्रत्येक विद्यार्थी संगणक साक्षर व्हावा आणि गाव डिजिटलदृष्ट्या प्रगत व्हावे, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात सौ. वर्षा पित्ती म्हणाल्या की, रोटरी क्लबने नजीक पांगरी गाव दत्तक घेऊन येथे भौतिक तसेच शैक्षणिक विकास घडविण्याचा निर्धार केला आहे. शाळेला 'हॅपी स्कूल' बनविण्याचा संकल्प असून, त्याचाच भाग म्हणून संगणक प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली आहे. पुढील बैठकीत गावाच्या समस्या आणि विकासाच्या गरजांवर चर्चा करून रोटरी क्लब त्यावर ठोस पावले उचलणार उचलणार असल्याने समस्या आणि आवश्यक सुविधांची यादी सरपंच, उपसरपंचांनी आमच्याकडे द्यावी, असे त्या म्हणाल्या.



मुख्याध्यापक डॉ. शिवाजी उगले म्हणाले की, संगणक प्रयोगशाळेमुळे आमच्या विद्यार्थ्यांना डिजिटल जगात पाऊल ठेवणे सोपे होईल. या सुविधेमुळे मुलांचा सर्वांगीण शैक्षणिक विकास होणार असून, आम्ही रोटरी क्लबचे मनःपूर्वक आभारी आहोत.

या कार्यक्रमाला रोटरी परिवारातील अकलंक मिश्रीकोटकर, सुनीती मदान, सुरेश मगरे, किशोर देशपांडे, डॉ. दीपक बगडिया, रवी भक्कड, अर्चना देशपांडे, प्रशांत महाजन यांच्यासह गावातील मान्यवर, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हरितालिका



भाद्रपद शुद्ध तृतीयेला म्हणजे गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी येणार्या हरितालिका या सणाच्या दिवशी स्त्रिया आणि कुमारिका व्रतस्थ राहतात. हे व्रत करण्यामागील शास्त्र आणि या व्रताचे महत्त्व या लेखातून थोडक्यात जाणून घेऊया.

**इतिहास आणि उद्देश -** पार्वतीने हे व्रत करून शिवाला प्राप्त करून घेतले; म्हणून मनासारखा वर मिळण्यासाठी, तसेच अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया हे व्रत करतात.

**व्रत करण्याची पद्धत -** प्रातःकाळी मंगलस्नान करून पार्वती आणि तिची सखी यांच्या मूर्ती आणून त्या शिवलिंगासह पूजल्या जातात. रात्री जागरण करतात. दुसर्या दिवशी सकाळी उत्तरपूजा करून लिंग आणि मूर्ती विसर्जित करतात. हरितालिकेच्या पूजनाच्या वेळी १६ शक्तीस्वरूप नाममंत्रांचे पठण करत १६ पत्री शिवपिंडीवर वाहतात, त्यामुळे शिवपिंडीत शिवस्वरूप शक्तीचा प्रवाह आकृष्ट होतो. पत्रीपूजनातून अधिक प्रमाणात शक्तीची स्पंदने निर्माण होतात.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे,**
**सनातन संस्था, संपर्क- ९२८४०२७१८०**

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

## आजचे राशीभविष्य

**मेष** : आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला राहील. तुमच्या कामात प्रगती होईल आणि तुम्हाला नवीन संधी मिळतील. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील सदस्यांसोबत वेळ घालवल्याने आनंद मिळेल.

**वृषभ** : आज तुम्हाला तुमच्या कामात अधिक लक्ष द्यावे लागेल. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. आरोग्याची काळजी घ्या. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी विचार करणे आवश्यक आहे.

**मिथुन** : आजचा दिवस तुमच्यासाठी फलदायी ठरेल. नवीन लोकांशी संपर्क होईल, जो तुमच्यासाठी फायदेशीर असेल. व्यवसायात यश मिळेल. प्रवासाचे योग आहेत.

**कर्क**: आज तुम्ही घेतलेले महत्त्वाचे निर्णय योग्य ठरतील. तुमच्या कामामुळे तुम्हाला ओळख मिळेल. कुटुंबातील सदस्यांसोबतचे संबंध सुधारतील. शांत आणि संयमी राहणे फायदेशीर ठरेल.

**सिंह**: आज तुम्हाला तुमच्या कामात यश मिळेल. तुमचे नेतृत्वगुण दिसून येतील. प्रेमसंबंधात असलेल्यांसाठी दिवस चांगला आहे. आरोग्याची काळजी घ्या आणि वेळेवर आराम करा.

**कन्या** : काही गोष्टींमुळे तुम्हाला तणाव जाणवू शकतो. कोणतेही मोठे आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्या. अनावश्यक वाद टाळा. आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

**तुळ** : आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आहे. महत्त्वाच्या कामांमध्ये यश मिळेल. नातेवाईकांकडून मदत मिळू शकते. आर्थिक स्थिती मजबूत होईल आणि नवीन गुंतवणुकीसाठी चांगला दिवस आहे.

**वृश्चिक** : आज तुमच्या कामामुळे तुम्हाला ओळख मिळेल. व्यवसायात यश मिळेल आणि नवीन संधी मिळतील. कुटुंबातील सदस्यांसोबतचे संबंध चांगले राहतील आणि घरात आनंदाचे वातावरण राहील.

**धनु** : आज प्रवासामुळे थोडा थकवा जाणवू शकतो. आर्थिक बाबतीत काळजी घ्या. कोणतेही मोठे व्यवहार करण्यापूर्वी विचार करा. संयम ठेवणे महत्त्वाचे आहे.

**मकर** : आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला आहे. नवीन काम सुरू करण्यासाठी दिवस योग्य आहे. तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कुंभ** : कामाच्या ठिकाणी तुम्हाला यश मिळेल. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तुम्हाला प्रशंसा मिळेल. मित्रांसोबत चांगला वेळ जाईल. आरोग्याची काळजी घ्या आणि योग्य आहार घ्या.

**मीन** : आज तुम्हाला तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कोणत्याही वादापासून दूर राहा. कुटुंबासोबत वेळ घालवणे फायदेशीर ठरेल. आर्थिक व्यवहार करताना सावध राहा.

**टीप:** हे सामान्य राशी भविष्य आहे. प्रत्येक व्यक्तीच्या कुंडलीनुसार त्यात बदल होऊ शकतो. अधिक माहितीसाठी तुम्ही ज्योतिषाचा सल्ला घेऊ शकता.

### डॉ. अर्जुन साबळे यांनी लावले कौशल्य पणाला...

# अन् तरुणाच्या बंद पडलेल्या हृदयाची ठोके पुन्हा धडधडू लागली

**परतूर । प्रतिनिधी -** येथील प्रसिद्ध कोठाळकर हॉस्पिटलचे डॉ.अर्जुन साबळे यांनी हृदयाचा अटॅक आलेल्या तरुणावर यशस्वीपणे उपचार करून जीवनदान दिल्याने बंद पडलेले हृदय पुन्हा धडधडू लागल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

सालगाव येथील एक तरुण वय २७ वर्षे या तरुणाला हृदय विकाराचा झटका आल्याने त्याला परतूर येथील कोठाळकर हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी तातडीने दाखल केले. डॉ.अर्जुन साबळे यांनी त्याच्यावर तात्काळ यशस्वीपणे उपचार करून तरुणाला जीवदान दिले.

> तरुणाला हायपर क्यूट मायोकार्डियल इन्फार्कशन, हृदयाचा तीव्र अटॅक होता. त्यामुळे आपत्कालिन आयसीयू मध्ये डमिट केले. व थ्रम्बोलाईज करून जीव जाण्याच्या धोक्याच्या बाहेर काढले. नंतर अन्जियोग्राफी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.
>
> **- डॉ अर्जुन साबळे**

अन् तरुणाचे बंद पडलेले हृदयाचे ठोके पुन्हा धडधडू लागले. सत्तावीस वर्षीय तरुणाला हृदय विकाराचा झटका आल्याने रूग्णाची प्रकृती नाजूक झाली होती , यावेळी डॉ.अर्जुन साबळे यांनी त्यांचे कौशल्य पणाला लावून या तरुणाचे प्राण वाचविले.

यावेळी मृत्युच्या दाढेतून बाहेर आलेल्या तरुणाच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून सर्वांना आनंद वाटला. यावेळी तरुणाला आलेल्या हृदय विकाराचा झटक्याची परिस्थिती प्रत्यक्षात पाहणाऱ्यांनी सुध्दा डॉक्टरांच्या कौशल्याचे कौतुक केले आहे. तसेच प्रत्यक्ष मृत्यू समक्ष पाहिल्याची प्रतिक्रिया दिली. तर डॉ अर्जुन साबळे यांच्यामुळे तरुणाला पुनर्जन्म मिळाल्याची प्रतिक्रिया नातेवाईकांनी दिली आहे. तसेच डॉ.अर्जुन साबळे यांच्या कौशल्य पणाला लावून केलेल्या उपचाराचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

परतूर शहरात तरुणाला हृदय विकाराच्या झटका आल्याने आणि त्याला डॉक्टरांनी जीवनदान दिल्याने रुग्णाच्या हृदयाची ठोके पुन्हा धडधडु लागले. डॉ. अर्जुन साबळे यांनी मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढून तरुणाचे प्राण वाचविल्याने रुग्णासाठी डॉक्टर देवदूत ठरले असल्याच्या भावना अनेकांनी व्यक्त केल्या.

## भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** महानुभाव पंथाचे संस्थापक, लिळाचरित्रकार भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त (जयंती) जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे यांच्यासह अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते.

## कौशल्याबाई पाडेवार यांचे निधन



**परतूर -** शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगरातील रहिवाशी कौशल्याबाई दादाराव पाडेवार यांचे सोमवारी मध्यरात्री एक वाजता निधन झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

माजी नगराध्यक्ष दादाराव पाडेवार यांच्या त्या पत्नी होत. दलित चळवळीचे नेते तसेच सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार अर्जुन पाडेवार यांच्या त्या मातोश्री होत.

## यशोदाबाई शर्मा यांचे निधन



**परतूर -** शहरातील जेष्ठ नागरिक यशोदाबाई जगन्नाथजी शर्मा (उपाध्याय) यांचे शुक्रवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८१ वर्षांच्या होत्या.त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.शनिवारी सकाळी त्यांच्या पार्थिवावर कैलासधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार केदार शर्मा त्यांचे चिरंजीव होत.

# आरोपी पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री यांना बरखास्त करण्याच्या विधेयकाचे स्वागतच; परंतु भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांना फाशीच्या शिक्षेचे प्रावधान का नाही?

केंद्र सरकारकडून १३० व्या घटनादुरुस्तीसह महत्त्वाची विधेयके लोकसभेत सादर केली यात १)भ्रष्टाचार किंवा गंभीर गुन्हेगारी आरोपांवर सलग ३० दिवसांपेक्षा जास्त काळ कोठडीत असलेल्या पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना ३१ व्या दिवशी पदावरून हटविता येणार.२)निर्दोष सुटका झाल्यानंतर पंतप्रधान,मुख्यमंत्री आणि मंत्र्यांची पुन्हा त्या-त्या पदावर नियुक्ती करता येणार.३)ज्या गुन्ह्यांसाठी त्यांना अटक केली आहे,त्यांच्या शिक्षेची तरतूद पाच वर्षे किंवा त्याहून अधिक असावी.४)संबंधीतांना दोषी ठरवण्यात आले नाही, तरीही प्रस्तावित कायद्यामुळे त्यांना त्यांच्या पदावरून काढून टाकता येणार.या संपूर्ण घटनादुरुस्तीचे मनापासून स्वागत आहे.परंतु गेल्या अनेक वर्षापासून देशातील आजी-माजी ९५ टक्के भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांनी देशाला पोखरून टाकले आहे त्याचे काय?असा प्रश्न आजही १४० कोटी जनतेच्या मनात भेडसावत असतो.या विधेयकात आणखी एक सुधारणा करायला पाहिजे होती ती म्हणजे भ्रष्टाचारी राजकीय पुढाऱ्यांना फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चौकशी करून ताबडतोब फाशीच्या शिक्षेचे प्रावधान आवश्यक होते.कारण देशातील किंवा राज्यातील संपूर्ण आरोपांची मुख्य जड व ही फक्त भ्रष्टाचार आहे.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांवर जर सरकारने लगाम कसली तर अनेक आरोपींची संख्या आपोआप कमी होईल.सरकार जोपर्यंत भ्रष्टाचाऱ्यांसाठी फाशी सारखा कठोर शिक्षेचा कायदा बनवित नाही तोपर्यंत भ्रष्ट राजकीय पुढारी सैलासी सांडासारखे मोकळे फीरतच रहातील व अनेक नवीन-नवीन गुन्हेगार निर्माण होतील.त्यामुळे भ्रष्टाचारी आरोपी हा राजकीय पुढारी असो अथवा अधिकारी यांच्यावर लगाम जर सरकारला कसायची असेल तर त्यावर फाशीची शिक्षा हाच एकमेव पर्याय आहे व उपाय आहे असे मला वाटते. आज राज्यातच नाही तर संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणात अनेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व गुन्हेगारी सुरू आहे आणि याला प्रोटेक्शन देण्याचे काम राजकीय पुढारी खुलेआम करतात कारण त्यांच्या हातात सत्ता असते. त्यामुळे ते सत्तेचा दुरूपयोग करून १४० कोटी जनतेचे रक्त पितात व स्वतःची गडगंज संपत्ती जमा करून ठेवतात.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना फाशी सारखी कठोर शिक्षा झाली तरच देशाच्या १४० कोटी जनतेला व शेतकऱ्यांना समाधान वाटेल.आज कोण गरीब आणि कोण श्रीमंत याची तुलना जर केली तर आज देशातील ९५ टक्के आजी-माजी राजकीय पुढारी करोडपती आहेत.जे स्वतःला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व समाजसेवक म्हणतात यांच्या जवळ एवढा पैसा आला कोठून आणि येतो कोठून? ही बाब राज्य व केंद्र सरकारला खरोखरच माहीत नसावी का?असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत आहे.सरकारने कायदे कानुन बनवावे परंतु ते जनहीताचे असायला पाहिजे तेव्हा त्या कायद्याला किंवा विधेयकाला खरे लोकशाहीचे प्रारूप येईल. जगात भारत कृषीप्रधान देश म्हणून ख्याती आहे.त्या अनुषंगाने देशातील प्रत्येक शेतकरी आजही करोडपती आहे. परंतु मात्र पैशांनी शुन्य आहे असे का?याचा विचार राज्य व केंद्र सरकार का करीत नाही? शेतकरी अनेक काळापासून शेती करीत आहे त्याला उन,पाऊस,वादळ, सुनामी,अकाल, अती उष्णता,अती पाऊस,पुर परिस्थिती अशा अनेक कठीण आणि अवघड परिस्थितीशी सामना करावा लागतो तेव्हा त्यांच्या शेतातून धान्य उत्पादन होते व देशाच्या १४० कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरत असतो.परंतु देशाचा राजकीय पुढारी फक्त पाच वर्षे लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी असतो परंतु या पाच वर्षांत अचानक करोडपती होतो व मोठ्या प्रमाणात चल-अचल संपत्ती यांच्या जवळ येते हा पैसा येतो कोठून यांचाही विचार सरकारने केला पाहिजे.कारण पीढ्यानपीढ्या शेती करणारा गरीब आणि पाच वर्षे लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी असणारा करोडपती ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे असे मला वाटते.सत्ताधारी पक्ष आपली सत्ता टिकुन राहावी यासाठी अनेक भ्रष्टाचारी,हत्यारे, बलात्कारांचे गुन्हे असलेल्या अनेक गुन्हेगारांना सत्ताधारी पक्ष जवळ घेतो आणि असे गुन्हेगार राजकीय पुढारी आजही सत्तेत आहेत,सोबतच मंत्री सुध्दा आहेत ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल.एक भ्रष्टाचारी व्यक्ती लाखो लोकांचे घर पोखरतो त्यामुळे बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां उद्भवतात अशा प्रकारे देशात हजारो भ्रष्ट राजकीय पुढारी आहेत की ते देशाच्या १४० कोटी जनतेला स्लोपॉयझन देण्याचे काम करतात. आपण बलात्कारी,खुनी,आतंकवादी असे अनेक गुन्हेगार पहालेत आणि पहातो परंतु याही पेक्षा हजार पटीने देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी व अधिकारी गुन्हेगार आहेत कारण तो भ्रष्टाचार करून सात पिढ्यांची करोडोंची संपत्ती कमवीतो आणि यामुळे चलनातील पैसा आपोआप गायब होतो त्याचा फटका व प्रायश्चित्त देशातील गरीब व सर्वसामान्य १४० कोटी जनतेला भोगावा लागतो. त्यामुळेच देशात बेरोजगारी,महागाई व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां वाढल्याचे दिसून आले.राजकीय पुढारी जेव्हा लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी बनतो तेव्हा देशाच्या प्रती, राज्याच्या प्रती आणि देशातील जनतेच्या सुख समाधानाच्या प्रती देशहिताचे कार्यकरण्याची संविधानिक शपथ घेतो.अशा लोकांनी थोडासाही गुन्हा केला तर त्याला संविधानीक पदावरून हटविलेच पाहिजे तेव्हा लोकशाही टिकून राहील.देशात २८ राज्य व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत आणि या संपूर्ण ठिकाणी ९५ टक्के राजकीय पुढारी व अधिकारी भ्रष्टाचार करून मालामाल झाले आहेत व यामुळे देश १० वर्षे मागे गेला आहे याचे प्रायश्चित्त शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना भोगावे लागत आहे आणि याचे चित्र बेरोजगारी, महागाई व शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या स्वरूपात आपण पहातो आहे.त्यामुळे महामहीम राष्ट्रपती, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, उपराष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय यांना विनंती करतो की देशाला पोखरणाऱ्या मोठा किडा म्हणजे भ्रष्टाचार आणि याची उत्पत्ती राजकीय वर्तुळातुनच निर्माण झाली आहे व ही बाब संपूर्ण देश चांगल्याप्रकारे जानतो त्यामुळे वरील मान्यवरांना विनंती आहे की देशाला सुजलाम सुफलाम करायचे असेल तर सर्वप्रथम भ्रष्टाचाऱ्यांच्या मुसक्या आवळने अत्यंत गरजेचे आहे.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

पान १ वरुन

### जिल्हाधिकारी ...

प्रास्ताविक पुष्कराज तायडे यांनी केले यात त्यांनी अमेझॉन,डोनेट कार्ट कडून जालना जिल्ह्यात आलेल्या अतिवृष्टी बाधित कुटुंबांना ३०० किट्स उपलब्ध करून देण्यात आल्या असून त्याचे वाटप जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात येत असून बाधित कुटुंबांपर्यंत पोहचणार आहोत. असे स्पष्ट केले. तर सूत्रसंचालन आणि आभार प्रा.डॉ.रामदास निहाळ यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी भास्कर उघडे, विशाल उघडे, राहुल उघडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी बाधित नागरिक उपस्थित होते.

### महावितरणचा जास्तीच्या ...

यामुळे अनेक अडी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भातील तक्रारींची दखल घेतली जावी व तातडीने स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे. तसेच राज्यातील ग्राहकांच्या हितरक्षणाकरिता शासनाने तातडीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

घरगुती ग्राहकांच्या वीज देयकातील सर्व अधिभारांचे पारदर्शक व तपशीलवार स्पष्टीकरण सार्वजनिक करावे. शंभर युनिटपर्यंत वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठी अधिभार व स्थिर शुल्कावर मर्यादा घालून संरक्षित दर लागू करावेत. स्मार्ट मीटर संदर्भातील सर्व तक्रारींची स्वतंत्र चौकशी करून ग्राहकांना योग्य पर्याय उपलब्ध करून द्यावेत. औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांचे अधिभार घरगुती ग्राहकांवर टाकले जाणार नाहीत, याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत. विलंबाने देयक भरल्यास घरगुती ग्राहकांचे विद्युत कनेक्शन तात्काळ तोडण्याऐवजी किमान पंधरा दिवसांची मुदत द्यावी. दरवाढ निश्चित करताना विद्युत निर्मिती खर्च, इंधन खर्च व वाहतूक खर्चाचा तपशीलवार हिशेब घेऊनच निर्णय घ्यावा. इंधन समायोजन अधिभार व इतर आकारणीच्या माध्यमातून जादा वसुल झाल्यास ती रक्कम पुढील देयकात कपात करून ग्राहकांना परत करावी. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या सार्वजनिक सुनावणीमध्ये शहरी व ग्रामीण भागातील ग्राहक प्रतिनिधींना अनिवार्यपणे सामावून घेण्यात यावे.

कृषी ग्राहकांना अधिभारातून सवलत देऊन त्यांच्या कनेक्शन तोडण्यापूर्वी किमान तीस दिवसांची मुदत देण्यात यावी. स्मार्ट मीटर भारतीय मानक ब्युरो प्रमाणित असल्याची खात्री करून, चुकीच्या देयकाबाबत ग्राहकांना तातडीने भरपाई मिळण्याची तरतूद करावी.गरीब व मध्यमवर्गीय घरांकरिता विशेष सवलतीचे दरपत्रक लागू करावे. गणेशोत्सव कालावधीत नागरिकांची रस्त्यावर वर्दळ असते तसेच अनेक कार्यक्रमांचे आयोजन केलेले असते त्यामुळे विद्युत पुरवठा अखंडित सुरु राहील, याची काळजी घ्यावी याप्रमे मागण्या करून त्या तातडीने सोडविण्याची मागणी केली.

उपतालुकाप्रमुख प्रभाकर उगले, प्रभाकर घडलिंग, तालुका संघटक बाबुराव कायंदे, विभाग प्रमुख पंडितराव क्षीरसागर, बळीराम ढवळे, सुरेशराव वाघमारे, जनार्दन गिराम, तुळशीदास काळे, विष्णुपंत गिराम, उपशहर प्रमुख अजय रोडीये, युवासेना उपशहरप्रमुख किरण तुम्मा, सोनाजी खांडेभराड, जीवन खंडागळे, गणेश लाहोटी, इम्तियाज, फुरकन सय्यद, अब्दुल नईम, सुनील तोडकर, अर्जुन शेवाळे, विठ्ठल पाऊलबुद्धे, आसाराम वाघमारे, किसन घडलिंग, तुळजाराम माधवले, चिंन्नूलाल माधवले, महादेव कावळे, श्याम कुलथे, तुकाराम भुतेकर यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# जालन्याच्या गणेशोत्सव हंगामास दमदार प्रारंभ

## श्री श्रेय गणेश मंडळ काद्राबादचा सम्राटचे जल्लोषात आगमन; ढोल-ताशांच्या गजरात बेझनजी रोड थरारला

**जालना । प्रतिनिधी -** काद्राबाद येथील श्री श्रेय गणेश मंडळाचा सम्राट रविवार (दि. २४ ऑगस्ट) रोजी सायंकाळी सात वाजेच्या दरम्यान दिमाखात शहरात दाखल झाला. गोविंद गर्जना ढोल पथकाच्या काड्या आणि ताशांच्या लयीत, एसआरएस लाईट-डेकोरेशनच्या प्रकाशात बेझनजी रोडवर जालनेकर थिरकले. मंडळाच्या नवव्या वर्षीच्या आगमन सोहळ्याने संपूर्ण परिसरात उत्सवाची चाहूल लागली ढोल-ताशा, पारंपरिक घोषवाक्ये आणि रंगीत लाईटिंगमुळे आगमन लक्षवेधी ठरली.

भास्करराव अंबेकर (जिल्हाध्यक्ष, शिवसेना-उद्धव ठाकरे) व अभिमन्यू खोतकर (युवा नेते) यांनी मंडळाच्या श्री गणेश मुर्तीची स्तुतिसुमने अर्पण केली. मंडळ गेली ८ वर्षे सातत्याने गणेशोत्सव साजरा करत असून यंदा नववे वर्ष विविध नवनवीन उपक्रमांनी समृद्ध करण्याचा मानस व्यक्त झाला.

आगमनावेळी विविध राजकीय, सामाजिक, व्यावसायिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती नोंदवली. यामध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) भास्करराव अंबेकर (जिल्हाध्यक्ष), युवा नेते अभिमन्यू खोतकर, गणेश महासंघाचे अध्यक्ष रोहित भुरेवाल, जालना गणेश महासंघाचे महासचिव मनिष नंद, संजय सुरासे, उपाध्यक्ष शुभम काटकर, अहिर गवळी समाज संमेलन अध्यक्ष धनूलाल झाडीवाले, जगदिश प्रिथ्यानी, आश्विन अंबेकर, विक्की वाघमारे, माजी नगरसेवक रमेश गौरक्षक, दिनेश भगत, राजु जैन, मनोज भगत, अभिजीत नागोटी, डमरु ओस्तवाल, नितीन जांगडे, महेश दुसाने, संजय भगत, सेवक नरियलवाले, कपिल चौधरी, मेघराज भगत, शुभम घाटेकर, अक्षय पवार, कार्तिक पवार, योगेश देवावाले, प्रणय सारस्वत, रुपेश भगत, अंकित भुरेवाल, राजू मिसाळ, आकाश भुरेवाल, अजय मिसाळ, अविनाश भुरेवाल, सखाराम मिसाळ, शुभम भुरेवाल, सिद्धार्थ झाडीवाले, सोनू भुरेवाल, रवी राऊत, वैभव काळे, रोहीत श्रीरंगम, राजा घारेगावकर, विश्वंभर कंठाळे, डॉ. शशांक झाडीवाले, डॉ. गणेश वाघ, विनेश कड, साहिल सरोदे, राम सांगोळे, अजय दोडके, कार्तिक पवार, दुर्गेश दोडके, किरण कंठाळे, राजू काजळकर, राहूल भगत, आदित्य पवार, गजानन सरोदे, पंकज दायमा, रामेश्वर सरोदे, महेश दोडके, किरण झारखंडे, अजय भगत, सोनू दोडके यांच्यासह अनेकांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

विविध समाजघटक, संघटना व राजकीय प्रवाह एकत्र आल्याने काद्राबाद परिसरातील सामाजिक बंध अधिक दृढ झाले. उत्सव हा स्पर्धेपेक्षा सहकार्याची दिशा देतो, याचा प्रत्यय आला. स्वयंसेवकांची शिस्तबद्ध धावपळ, समन्वय आणि सर्जनशील सादरीकरण यातून युवा शक्तीची संघटनकौशल्ये जाणवली-हे दीर्घकालीन सांस्कृतिक नेतृत्व घडवण्याचे लक्षण.

सलग आठ वर्षांची परंपरा आणि दरवर्षी नवीन काहीतरी देण्याचा प्रयत्न यामुळे श्री श्रेय मंडळ स्वतःचा ओळख मॉडेल बनला आहे. यंदाचे नववे वर्ष त्या सातत्याचा पुढचा टप्पा ठरतो.

मोठ्या जनसमुदायात शिस्तबद्ध मिरवणूक, दिशादर्शक स्वयंसेवक आणि समन्वयकांचे स्पष्ट दायित्व या आगमनातून दिसून येते.

श्री श्रेय गणेश मंडळ, काद्राबादचा सम्राट आगमन सोहळा हा केवळ मिरवणूक नसून समाज, संघटन, युवा-ऊर्जा आणि सांस्कृतिक सातत्याचा सामूहिक उत्सव ठरला. बेझनजी रोडवर उसळलेला जल्लोष जालन्याच्या गणेशोत्सव हंगामाला दमदार प्रारंभ देऊन गेला.



श्री श्रेय मंडळाला भारतीय जनता पक्षाचे नविन जालना अध्यक्ष सुनील पहेलवान खरे, शिवसेना (उद्धव ठाकरे) शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले, सचिन मिसाळ, संजय सुरासे, सुनील नंद, राजू खडके, देवेंद्र भगत, रविंद्र भगत, आकाश भुरेवाल, प्रकाश पवार, प्रमोद वाघमारे, राजेश कांबळे, विक्की क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.

मंडळाचे अध्यक्ष यशराज जोडीवाले (यादव), उपाध्यक्ष कार्तीक सुरासे, सचिव आदीत्य मालोदे, साई खडके, भावेश भुरेवाल, निखील घारेगावकर, हर्ष परदेसी, तनुज मिसाळ, आदित्य जांगडे, सोनू खर्डेकर, सम्यक गौरक्षक, अक्षय मिसाळ, उदय मिसाळ, जय मिसाळ, हर्ष जोडीवाले, ओम खडके, ध्रुव सुरासे, श्रीराज सुरासे, कृषा झोरे, रोहन चौधरी, ओंकार मिसाळ, तन्यम मिसाळ, रुद्र उदावंत इत्यादींनी आगमन सोहळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

यावेळी सिद्धीविनायक गणेश मंडळ, अवतार गणेश मंडळ, विघ्नराज गणेश मंडळ, बजरंग गणेश मंडळ, पहेलवान ग्रुप, काद्राबादचा राजा गणेश मंडळ, तरुण गणेश मंडळ, विघ्नहर्ता गणेश मंडळ, सुखकर्ता गणेश मंडळ, अष्टविनायक गणेश मंडळ, युवा गणेश मंडळ, ग्वालेश्वर गणेश मंडळ आदी मंडळांचे पदाधिकारी मिरवणुकीत सहभागी झाले.





**शहरात गणेशोत्सवाचा उत्साह वाढत असताना, यंदाची लक्षवेधी ठरलेली 'विघ्नहर्ता गणेश मंडळा'ची गणेश मूर्ती काल रात्री जालन्यात दाखल झाली. छत्तीसगडमधील रायपूर येथून खास आणलेली ही मूर्ती काळ्या मातीपासून बनलेली असून, ती राधा आणि कृष्णाच्या रूपात साकारण्यात आली आहे. मूर्ती आणण्यासाठी तब्बल ३६ तास लागले. कोष्टी गल्ली येथे ही मुर्ती बसविण्यात येणार आहे. युवकांनी फोटो काढण्यासाठी एकच गर्दी केली होती. बाजुच्या छायाचित्रात तर वरिल छायाचित्रात कन्हैया नगरचा राजा छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ त्याचे आगमन झाले असून बुलडोझर साह्याने फुगे सोडण्यात आले. (छायाचित्र किरण खानापुरे)**

## ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयातील शिबिरात ३१ जणांचे स्वयंस्फूर्त रक्तदान



**जालना । प्रतिनिधी -** विश्वबंधुत्व दिन आणि राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त जालना येथील ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयतर्फे शुक्रवारी (दि. २२ ऑगस्ट) भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ३१ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजसेवेची परंपरा जोपासली.

शहरातील मंठा चौफुलीवरील राजयोग भवन येथे सकाळी ७.३० ते दुपारी १२ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात जनकल्याण रक्तकेंद्रचे सहकार्य लाभले. रक्ताच्या तुटवड्याची गरज लक्षात घेता आयोजित या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले. रक्तदानामुळे तीन रुग्णांचे प्राण वाचू शकतात, हा मौल्यवान संदेश या शिबिरातून अधोरेखित झाला. पुण्यतिथीचे औचित्य साधून समाजोपयोगी कार्याद्वारे दादीजींना अभिवादन करण्यात आले.

सर्वप्रथम कल्पना लाहोटी आणि डॉ. सतीश मोरे यांच्या रक्तदानाने शिबिराला सुरुवात झाली. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ब्रह्माकुमारी शितल दीदी, ब्रह्माकुमारी अर्चना दीदी, कल्पना लाहोटी, सुनील लाहोटी, डॉ. सुरेश मणियार, लक्ष्मीनारायण मानधना, सौ. आशा मानधना, मनोज जयस्वाल, ज्ञानदेव पायगव्हाणे, सौ. सुषमा पायगव्हाणे, डॉ. सतीश मोरे, भारती मोरे, शाम शेलगावकर, अशोक करवा, वीणा साबू व विद्यालयातील कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनकल्याण रक्त केंद्रचे शिवराज जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तसंकलन केले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.